# मुकुल माधव फाऊंडेशनच्या मदतीने उच्च शिक्षणाचे स्वप्न पूर्ण

विश्वास शिंदेची बेताची आर्थिक परिस्थिती आणि कायमच्या बहिरेपणाचे अनपेक्षित संकट, याचा धीराने सामना करत विश्वासने दहावीची परीक्षा ८०% गुण मिळवून उत्तीर्ण केली आणि रत्नागिरी येथील शासकीय तंत्रनिकेतनमध्ये मेकॅनिकल इंजिनियरिंग डिप्लोमा अभ्यासक्रमास प्रवेश घेतला. शारिरीक अडचणींचा सामना करतच उच्च शिक्षणाचा प्रवास सुरु केलेल्या विश्वासच्या स्वप्नांवर मुकूल माधव फाऊंडेशनने विश्वास ठेवला. फक्त शारिरीक अडचणीवर मात करण्यापुरते नाही तर उच्च शिक्षणाचे स्वप्न पूर्ण करण्यातही मुकूल माधव फाऊंडेशनने विश्वासला साथ दिली.